# तोष्णीवाल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ड-झोन Power Lifting, Weight Lifting Best Physique स्पर्धेत यश









## तोष्णीवाल महाविद्यालयीन खेळाडूंचे यश



सेनगाव – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व संत तुकाराम महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने १५ नोव्हेंबर रोजी आयोजित आंतर महाविद्यालयीन ड-झोन वेट लिफ्टिंग,पावर लिफ्टिंग व बेस्ट फिजिक या स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत घवघवीत यश संपादित केले.

सदर स्पर्धेमध्ये गाढवे हनुमान विलास ७४ किलो वजन गटात पावर लिफ्टिंग मधे प्रथम क्रमांक, गायकवाड अभय अनिल १०५ किलो वजन गटात पावर लिफ्टिंग मधे प्रथम क्रमांक, अंभोरे राजू नामदेव ८८ किलो वजन गटात वेट लिफ्टिंग मधे प्रथम क्रमांक, गाढवे हनुमान विलास ७४ किलो वजन गटात बेस्ट फीजिक मधे प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयीन खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थाअध्यक्ष बी.आर. तोष्णीवाल, सचिव यु.एम. शेळके, उपाध्यक्ष सुभाषआप्पा एकशिंगे, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस.जी.तळणीकर यांच्यासह महाविद्यालयीन शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. सदर स्पर्धेसाठी क्रीडा विभाग प्रमुख प्रा. हेमंत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.